# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

इ-मेल: directorcrs78@gmail.com

जा.क्र. म.सं.के./विकास/ 496 /२०२६ दि. 10 / 07 /२०२६

### निविदा सूचना

**विषय:- मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत वाशिम रोड विभाग कार्यालय समोरील परिसरामध्ये हार्ड मुरूम टाकण्यासाठी निविदा दर (कोटेशन) बोलविण्या बाबत...........**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत वाशिम रोड विभाग कार्यालय समोरील परिसरामध्ये हार्ड मुरूम टाकण्याकरिता निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.

२. निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी व लिफाफ्यावर "**हार्ड मुरूम टाकणे**" असा उल्लेख करावा.

३. **मुरूम उत्खनन व मुरूम वाहतुकी करिता आवश्यक परवाना अथवा परवानगीची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील तसेच मुरूम उत्खनन व मुरूम वाहतुकी करिता निश्चित स्वामित्वधन व इतर शासकीय फी भरण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. परवाना, स्वामित्वधन व इतर शासकीय फी भरणा केल्याबाबतचे दस्तेवज संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचे कडे सादर करणे बंधनकारक आहे. सदर दस्तऐवज सादर केले नसल्यास देयक अदा करण्यात येणार नाही.**

४. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत प्रक्षेत्रावरील सदर काम करीत असतांना पिकाचे किंवा विद्यापीठ मालमत्तेचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

५. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत प्रक्षेत्रावरील सदर काम करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.

६. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत प्रक्षेत्रावर देण्यात आलेले सदर काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

७. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदाधारक/कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

८. निविदाधारक/कंत्राटदाराने देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती व सदर कामासंबंधित आवश्यक दस्तऐवज सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

९. या कार्यालयातर्फे निविदाधारक/कंत्राटदारास सदर काम करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य/मनुष्यबळ पुरविण्यात येणार नाही. सदर काम करण्याकरिता आवश्यक साहित्य/मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.

१०. निविदाधारक/कंत्राटदारास सदर कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल व संपूर्ण कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल.

११. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत प्रक्षेत्रावर सदर काम करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पंदेकृवि, अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१२. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत प्रक्षेत्रावर सदर कामाकरीताचे दर एक वर्षा करिता वैध राहतील.

१३. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. **२०.०७.२०२६** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पंदेकृवि, अकोला

# निविदा (कोटेशन) मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत वाशिम रोड विभाग कार्यालय समोरील परिसरामध्ये हार्ड मुरूम टाकण्याकरिता दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | प्रमाण | दर (रु.) |
|---|---|---|---|
| १ | वाशिम रोड विभाग कार्यालय समोरील परिसरामध्ये ६ इंच थर हार्ड मुरूम टाकणे | प्रति ब्रास | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

ठिकाण:
दिनांक:

**स्वाक्षरी**
नाव व संपूर्ण पत्ता